PAGE NO.: DATE: / ९ /

## हार-जीत

'मॅडम' आमच्यानंतर आमच्यानंतर तुमचा नंबर आहे ना? मग तुम्ही मुलांना तयार करा बरं का! मी त्यांना सावध करत होते. आज पुण्याच्या रंगमंदिरात आंतरशालेय सांस्कृतिक स्पर्धांसाठी आम्ही शिक्षिका विद्यार्थ्यांना घेऊन जात होतो. पोचलो होतो. रोज तीन शाळांच्या मुलांच्या स्पर्धा झाल्या होत्या. आमचा नंबर जवळच आला होता. मी मुलांना तयार करून माझ्या जवळच बसवले होते. तितक्यात कोणत्यातरी शाळेच्या शिक्षिकेचे शब्द माझ्या कानावर पडले. त्या मला सांगत होत्या "मॅडम मला मूल झाले नाही, पण मला मुलांची खूप आवड आहे, म्हणून आम्ही मुलगी दत्तक घेतली. मला मुलगीच आवडते. मुलींना खूप काहीतरी घेता येतं, नटवता-सजवता येतं. त्यांना काही घातले-तरी शोभूनच दिसतं, नाही का? पण माझं नशीबच फुटकं, आम्ही adopt केलेली ही मुलगीसुद्धा 'विशेष' आहे हो ऽऽ, हे कळल्यानंतरसुद्धा आम्ही निराश झालो नाही, ह्या मुलीचं संगोपन मी अगदी छान करते, कारण ती विशेष असली तरी 'कृपाप्रसादाने परमेश्वराने दिलेले फळ' मी प्रेमाने घेतले आहे." हे ऐकल्यावर एके ठिकाणी ऐकल्यावर गाण्याच्या ओळी आठवल्या. कोरल्या गेल्या. "ही मुलगी विशेष असणं ह्यात तिचा दोष नाही, आणि मला अशी मुलगी मिळणं ह्यात माझा तरी दोष काय?" आमचा हा संवाद गीतासुद्धा ऐकत होती. कळत नकळत तिला काय समजत होतं कोणास ठाऊक. मधेच गीता म्हणाली, 'मॅडम' चला लवकर, ह्यांच्यानंतर आपलाच नंबर आहे. तिला मी म्हणाले, हो ग, लगेच मी मुलांना स्टेजवर घेऊन गेले. त्यांना त्यांच्या त्यांच्या जागेवर उभे केले, आमच्या नंबराचा घोष झाला, पडदा सरकला, गाणं सुरू होऊन सात मिनिटात संपलेदेखील. परत येऊन आम्ही आपापल्या जागी स्थानापन्न झालो. आमच्या शेजारीच गीताची आई बसलेली होती आणि ती मला आपल्या मुलीची जन्मकथा सांगत होती. ती ऐकून माझे ही मन भरून आले, कारण मी रोजच नव्यानव्या मुलामुलींच्या जन्मकथा ऐकत होते, अर्थातच मी 'विशेष शाळेतील मुलांची' शिक्षिका होते ना? त्याच 'गीता' माझीच विद्यार्थिनी होती. गोरीपान-गुटगुटीत-बडबडी, हसरी-ना कधी आकांडतांडव ना आक्रस्ताळेपणा, शांत स्वभावाची-समजूतदारपणाशी सधन कुटुंबातली- लोकेस, जराकाही प्रश्न पडला की सांगायची 'मॅडम' फोन लावा त्यांना! कधीकधी आम्हांलासुद्धा वाटायचं 'ह्या मुलीला तर सगळ्याबाबत चांगल्या अवगत आहेत, मग हिला विशेष मुलगी का? म्हणायचे बर! बसनेवर लहानपणी येणारी चक्कर, सतत दोन वर्षे तीव्र घालणे, सारख्यासारख्या गोष्टींचे आकलन न होणे- दहादिवसांच्या दवाखान्याच्या काळात कायमचे त्रास होणे-

२

अशी काही कारणे, यामुळे तिच्यातले दोष भंग सौंदर्याने तितके
विशेषत्वाच्या शिक्का लागला होता - तोच दोषरहित. ही विशेष मुलांची
विशेष शाळा असली, तरी सामान्य शाळांप्रमाणे मनोरंजनाचे सांस्कृतिक
कार्यक्रम, तसेच मोठमोठ्या प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत होत होते. किंबहुना
आलेल्या निमंत्रितांना कधीकधी ~~आपणात~~ आपणात बोलून दाखवायचे, की
कोणतीही कला शिकून आत्मसात करता येते, उत्तम कलाकार मात्र जन्मावा
यावा लागतो. कदाचित देवाकडूनच या मुलांना असे वरदान मिळाले असावे -
असे या विशेष मुलांचा उत्तम कार्यक्रम बघून म्हणावेसे वाटले. ही मुले विशेष
नसून सामान्यच आहेत. शाळेची सहल - हा तर मुलांचा मोठा आनंद असतो.
आमच्या शाळेची सहल साधारणपणे डिसेंबर ते फेब्रुवारी पर्यंतच्या काळात असते.
कारण तेव्हा, थंडी - पाऊस - ऊन - यांचे प्रमाण सुसह्य असते. सहलीची पूर्ण तयारी -
त्यासाठी असलेली परवानगी, पालकांना सहलीसाठी केलेली निवेदने - शाळेचा बॅनर -
मुलांच्या ओळखपत्रांसाठी पालकांना सूचना, ही सगळी तयारी करायची असते. सहलीच्या
उत्सुकता बोलून मुलांचा उत्साहपूर सतत वाहता असतो. सहलीची तारीख आली -
सहल स्पेशल बस पताका - बॅनर - फुगे - फुलमाळांनी सजली. ठरलेल्या सूचनांनी
सर्व शिक्षकांनी - सोबत असलेल्या मुलांच्या नावाच्या यादीनुसार बसमध्ये
मुलांना बसविले, गटाप्रमाणे मुले जागेवर बसली. शाळेच्या नावाचा 'बॅनर' लावून
बसलेली मुले झकास दिसत होती. मुलांच्या आनंदाला उधाण आले होते. बसची
बस निघण्यापूर्वी शकुनाचा नारळ ओवाळला. कोणतीही शुभगोष्ट करण्यापूर्वी आधी
गणपतीबाप्पांचा जयजयकार करून लगेच मुलांमागून एक अशा आमच्या तीन
बसेस - मार्गावर पुढेपुढे सरकू लागल्या. गीता माझ्याच बसमध्ये होती. आज मुलांना
पुस्तकांचे ओझे नव्हते. अभ्यासाला पूर्ण सुट्टी होती. जिथे मुलांना खेळण्यासाठी
भरपूर - मोकळी जागा - जेवायला बसायला हिरवळीची जागा - भरपूर सावली -
तिथे असलेले जादूचे प्रयोग - कठपुतळीचे गृह - स्वच्छ पिण्याचे पाणी - मेंदीचा
आनंद - विदूषकांचे खेळ - कुंभाराचे चाक - खेळणी बनविण्याचे प्रात्यक्षिक -
पक्षीउद्यान अशा इत्यादिच्या गोष्टी - अशा भरपूर सुविधा असलेले आमचे
सहलीचे ठिकाण होते. इथेच मुलांच्या आनंदाची बाग बहरली. तिथे गेल्यावर
विद्यार्थ्यांना - लिंबू सरबत - कॉफी - रसनासारखे उत्तेजक पेय - त्यांच्याच
आवडीनुसार दिले. शाळेतून निघताना भरपूर नाश्ता झालाच असल्याने
मुले मनमोकळी हिंडली - फिरली - खेळली - हसली - रमली - बागडली. हे
सर्व करताना सर्व शिक्षिका जागरूकतेने लक्ष देत होत्या. अचानक कुणाला काही
धडपड झालीच तर फर्स्ट एड बॉक्स - सोबत होताच. या सगळ्या मनोरंजना आणि
दिलखुलास मजेत खूप वेळ मजेत घालवला अन् भोजनाची वेळ कधी झाली
हेसुद्धा मुले विसरली. उदरभरणाची वेळ होताच - स्वच्छ जागा बघून मुलांनी गोल
धरले - ताटांच्या रांगा मांडल्या गेल्या, शांतीत तयार करून आणलेले जेवण वाढले.

भोजनापुर्वीचे श्लोक सर्वांनी म्हटले. आज रोजचे डब्बे नव्हते तर सहभोजन होते. जेवणात त्यांना आवडणारा गोड पदार्थ असल्याने विद्यार्थी पोटभर मजेत जेवले. आणि थोड्याच वेळात पंगत उठली. थोड्याशा विश्रांतीनंतर मुले आपापल्या आवडीनुसार खेळ खेळू लागले - प्रत्येक ग्रुपप्रमाणे बरोबर शिक्षिका होत्याच. गीता मात्र खेळता खेळता मधेच डस्कवर तोंड करून बसली होती. मुलामुलींना खेळ सांगत असतांना - माझं लक्ष गीताकडे गेलं. मी तिच्याजवळ जाऊन बसले, तिला विचारलं - गीता सगळीमुलं मजेत खेळत असतांना, तु अशी गप्पगप्प का बसली आहेस गं? मग हळूच तिने मला सांगितलं, "माझं डोकं दुखतय - मला मळमळ तय आणि उलटी होईल असं वाटतय बाई! तिची जबाबदारी माझ्यावरच होती. मी पटकन माझ्याजवळ असलेली आवळ्याची सुपारी पर्समधून काढून तिला दिली. तिला किंचित बरं वाटलं आणि ती पुन्हा खेळू लागली. "पनिशमेंट - बेडूक उड्या - आईच पत्र, चेंडू फेक असे मजेचे खेळ खेळतांना सहलीची परतीची वेळ झाली हे मुले विसरली. शिट्टी वाजली. गीता अजून थोडी मलूलच होती. बसमध्ये मुलांना बसण्यापुर्वी शेवटचा खाऊ म्हणून सर्वांना "आइसक्रीम दिले. तेसुद्धा गीताने आवडीने खाल्ले. आता सर्व मुलांना रांगेतून बसमध्ये बसविले होते. गीताला थोडं बरं वाटत होतं, परंतु अजूनही तिचा मूड छान नव्हता. मुलांची हजेरी घेतांना गीता मधेच म्हणाली, "टिचर मला खूप मळमळतय" हजेरीच्या गडबडीत माझ्याकडून शब्द निघून गेले, "असं काय गं करतेस गीता - ॲडजि. कर ना! माझ्या या किंचितशा रागावण्याने तिचा पडलेला चेहरा आणखीनच रडवा झाला, बिचारी गप्प बसली. बिचारी हिरमुसली झाली. होत असलेली मळमळ तिने दाबून ठेवली. तिच्या या हालचालीमुळे मी मात्र भानावर आले. घरी आईबाबांच्या धाकाने मुले असहाय होतात, तर शाळेतसुद्धा शिक्षिकांच्या रागावण्यामुळे मुले हवालदिल होतात. गीता केविलवाणी झाली. पुन्हा माझ्या पर्समधून तिला आवळासुपारी दिली. खरी, पण मनोमन वाईट वाटले. मला मिळालेल्या "आदर्श शिक्षिकेच्या पुरस्काराची आठवण होऊ लागली. आज मला या पुरस्काराचा अपमान मी केल्याची जाणीव झाली. खरंम्हणजे गीताला सावरण्याची माझी जबाबदारी मोठी होती. पण आज वेगळंच काहीतरी घडलं होतं, देवच काय? पण मीसुद्धा स्वतःला माफ करू शकणार नाही, असंच सतत टोचणी मनाला टोचत होती. चार चौघींमधून बोलल्यावर गोळा येण्याचा- वरातीमागून घोडं धावण्याचा काय उपयोग असतो? तसंच काहीसं माझ्याबाबतीत घडलं होतं! माझ्याहातून बाण निसटून गीताच्या बालमनाला तो मारून गेला होता, मागे माझ्या बाणाची खूण उरली होती. मी गीताची गुन्हेगार होते.

P.T.O.

४

PAGE NO.: ४
DATE: / /

डाग पुसण्याचा निष्फळ प्रयत्न करत होते. अपराधाचा डाग गडद होता. निरागस मुलांना हँडल करण्याच्या - सत्संगाचा पाठ गिरवलेला मला शिवला. अपराधी भावनेने भारून मी गीताला जवळ घेऊन बसले होते. पण तिच्या हिरमुसलेल्या मुखकमलावरून फिरणारा तो हात आजचा हळवा नव्हता. गीता सगळंकाही विसरून जराशी खुशीत आली होती. मुलं त्यांच्या नियोजित स्टॉपवर उतरली होती. माझा आणि गीताचा उतरण्याचा स्टॉप एकच होता. आम्ही उतरताना हळूहळू उतरलो. बस निघून गेली. तिला आई दिसताच ती आनंदली; पण मला मात्र तो डाग दिसत होता. गीताला - मळमळ - उलटीचा झालेला त्रास, मी तिच्या आईला सांगितला - आईजवळ तिला सुपूर्द करून मी माझ्या घराकडे वळले, तितक्यात गीता म्हणाली, "मॅडम - अच्छा! उद्या या हं शाळेत नक्की. बाय बाय मॅडम" देवळातली घंटा निनादल्यावर साऱ्या स्पंदने मागे रेंगाळतात तसेच तिचे शब्द मला भारावून टाकत होते - घोंगावत होते. सहलीच्या आनंदाला मी गमावलं होतं. माझं अस्वस्थ अपराधीत मन देवासमोर उभं राहून सांगत होतं - देवा चुकीला माफी पण गुन्ह्याला शिक्षा असते हे मला माहित आहे. मी गीताची गुन्हेगार आहे म्हणून मला शिक्षा दे कर. देवाला वाहिलेले फूल खाली पडलं, त्याचा सुगंध बोलत होता "अगं ऽऽ गडबडीत झालेल्या आहारीइतक्या चुकीला गुन्हा म्हणत नाहीत, झालेली चूक सुधारणे आणि प्रामाणिकपणे मोठ्या मनाने सर्वांसमक्ष कबूल करणे खूप मोलाचे आहे, तेव्हा हे सर्व विसरून जा, हुरहुरलेल्या मनाने मी देवापुढे शरणागत झाले. गीताचा चेहरा समोर आणून तिला व्याकुळतेने सांगितले, "गीता" मी हरले, मला क्षमा कर." दुसऱ्या दिवशी शाळेत गेल्यावर गीता वर्गात असलेली पाहून मी तिला आईच्या मायेने कुरवाळले, घट्ट मिठीत घेतले, ती मात्र सगळं विसरून, नेहमीप्रमाणे गोड हसत होती.

सुधा मराठे

Mo - 9921215334

डावी भुसारी कॉलनी · कोथरूड
पौड रोड. पुणे ३८

